# रेणू एक अनोखा जीवनसंग्राम - भाग ३

हल्लीच एका कंपनीने वनस्पतीजन्य औषधांचे उत्पादन सुरू केले. ही कंपनी सॅनफ्रांसिस्कोला होती. त्यांना अनुभवी चांगले रिसर्च असिस्टंट्स हवे होते. रेणूच्या ऑफिसमधले तिच्याबरोबरचे दोघे-तिघे इथल्या कामात व विशेष करून नव्या स्टाफच्या नाकर्तेपणाला कंटाळले होते. त्यांनी त्या कंपनीची ऑफर स्वीकारली. ते रेणूलाही त्यांच्याबरोबर चल म्हणत होते. खरे म्हणजे नवीन काम व अधिक दाम असे दोन्ही चांगले हेतू साध्य होत होते. पण रेणूला ते नको वाटले. कारण इथे तिची मैत्रीण स्वाती आणि अमेरिकेत आल्यापासून आईचे प्रेम देणारी तेरेना ऑंटी या दोघींची तब्येत ठीक नव्हती. या दोघींच्यात तिचा जीव गुंतला होता. त्यांना सोडून जायला तिला अजिबात नको वाटले. असेच सहा महिने गेले आणि एक दिवस तेरेना ऑंटीच्या मृत्यूची बातमी ती राहत असलेल्या ज्येष्ठ नागरिक घरकुलातून आली. रेणुकाला तिच्या डेथ सेरिमनीला बोलावले होते. मनातून भरून आले. रडू आले तरी तिथे कोणी रडत नाही, चेहऱ्यावर दुःख दिसते न दिसते, पण सर्वत्र शांतता असते. तिथेच तिला शीला भेटली. ती तेरेना ऑंटीच्या कुठल्यातरी ग्रुपमध्ये सामील होती. तेरेनाचा पत्त्यांचा, समाजसेवेचा, शाळेतल्या मुलांना पिकनिकला नेणारा, गरीब मुलांना आधार देणारा अशा अनेक ग्रुपमध्ये सहभाग असे. त्यात ही शीला पण तिच्याबरोबर सामील असायची. शीलाची मुले मोठी होती. विद्यापीठात शिकत होती. नवरा आपल्या कामात मग्न असायचा. शीलाला तेरेना आवडली व ती तेरेनाच्या कामाला हातभार लावू लागली. रेणूला शीला प्रथम भेटीतच आवडली व शीलालाही रेणुका. तेरेनाने तिला रेणूबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या होत्या. पण भेटीचा, ओळख व्हायचा योग आला नव्हता. आता ओळख झाली व तिला या मुलीचे कौतुक वाटले. घरी येताना दोघी बरोबरच आल्या. कधीकधी शीला तिला फोन करायची. सुट्टीच्या दिवशी कधीकधी दोघी भेटायच्या. नवीन मैत्री फुलत होती. आईचे प्रेम देणारी तेरेना गेली, पण जाताना मोठी बहीण देऊन गेली असे रेणूला वाटले. असे वर्ष गेले आणि एक दिवस उगवला तो ती काळी बातमी घेऊन!

स्वाती आपल्या दोन्ही बछड्यांना पोरके करून देवाघरी गेली. रेणूला  खूप वाईट वाटले. एकदा तिला त्या दोघांना आपल्याकडे आणावे असे वाटले. पण तिला त्यांचे चांगले संगोपन करता येईल असे खात्रीशीर वाटत नव्हते. त्यामुळे कुठेच चांगली सोय झाली नाही तर शेवटचा उपाय हा असा तिने मनाशी ठरवले. सध्या त्यांना स्वातीच्या शेजारणीने आपल्या घरी नेले होते. कारण तिच्या मुलांत ही मुले रमतील. त्यांची त्यांना सवय होती. शिवाय संचय दुसरीत व समिधा के.जी.त होती. त्यांची शाळा चालू होती. सध्या मे महिना चालू होता. पुढे जून पर्यंत शाळा, दोन महिने सुट्टी. त्यानंतर सप्टेंबरमध्ये शाळा चालू. या दोन महिन्यांच्या अवधीत त्यांच्यासाठी चांगले फॉस्टर पेरेंट्स मिळवणे गरजेचे होते. रीना त्यात कामाला लागलीच होते पण रेणूला वाटे, फॉस्टर पेरेंट्स मुलांना नीट

वागवतील ना, की पैश्यासाठी, पैशाच्या मोहाने ही जबाबदारी घेतात? काही वेळेला दरवर्षी हे पेरेंट्स बदलले जातात. मग त्या मुलांना जीवनात स्थैर्य, सिक्युरिटी काय वाटणार? संस्कार, प्रेम या तर वेगळ्या गोष्टी आहेत. ती अशाच विचारात असता एक दिवस शीला तिच्याकडे आली. आज शीला बऱ्याच त्रासलेल्या मूडमध्ये दिसली. रेणूकाने विचारले, "शीलाताई काय झाले?"

शीला पण मूळची मुंबईचीच होती. त्यामुळे दोघे मराठीतच बोलत. शीला त्रासलेल्या स्वरात म्हणाली, "आमची मीना आज डिव्होर्स घ्यायचं खूळ  मनात घेऊन बसली आहे. हिला सुखच दुखतं तर काय?" रेणूला मीना कोण हे माहीत नव्हते. ती ऐकत राहिली. "काय करावे कळत नाही, यांचे प्रेम लग्न!' बरं नवरा इतका प्रेमळ की हिला जराही दुखवत नाही. पैसा-अडका सर्व भरपूर आहे आणि हे खूळ कसले?" रेणूला शीलाची अस्वस्थता दिसत होती. पण काही आकलन झाले नाही. तिने थंड सरबताचा ग्लास हातात देऊन शीलाला सोफ्यावर बसवले व नंतर हळूहळू शांतपणे सर्व माहिति विचारली, तेव्हा सांगितले की मीना ही तिची धाकटी बहीण. तिच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान. मध्ये पाच वर्षांनी लहान एक भाऊ आहे. शीला लग्न झाल्याबरोबर नवऱ्याबरोबर इथे आली. त्यानंतर भाऊही शिकायला इथे आला. तो नोकरी करत इथेच स्थायिक झाला. त्याने मीनाला व तिच्या नवऱ्याला इथे बोलावले. मीनाचा नवरा आय.टी. इंजिनियर. त्याची नोकरी उत्तम आहे. मीना पण बँकेत नोकरी करते. लग्न आठ वर्षे झाली. अजून मूल नाही. सगळ्या टेस्ट्स झाल्या. दोघांतही दोष नाही. मीनाने  असे ठरवले की आपण त्याला डिव्होर्स दिला की तो दुसरे  लग्न करेल व त्याला मूल होईल. ते त्याला अजिबात मंजूर नाही. तसे तो डिव्होर्स द्यायला तयार आहे व मीनाला सांगतो की तिने दुसरे लग्न करावे. तिला मूल होऊ दे. ती दोघे एकमेकांशिवाय चार दिवस राहू शकत नाहीत आणि आता असा गोंधळ घालत आहेत. रेणूने विचारले, "दोघांनाही मुलांची आवड आहे का?" तर शीला होय म्हणाली. प्रत्येक नातेवाईकांच्या मुलांचेही दोघेही खूप लाड करतात. माझ्या मुलांना देखील आम्हा दोघांपेक्षा मावशी काका जास्त आवडतात. आपले मन मोकळे करुन शीला स्थिरावली. तेव्हा तिच्या लक्षात आले की रेणूचा चेहरा चिंताक्रांत दिसतो आहे. तेव्हा शीला म्हणाली, "माझ्या डोक्यातली चिंता मी तुझ्या डोक्यात घुसवली ना? सॉरी!"

त्यावर रेणूने तिला स्वानंद-स्वातीची सर्व हकीकत सांगितली व म्हणाली, "आता शाळा संपायला एक आठवडा राहिला आहे. त्यानंतर या दोन मुलांची व्यवस्था करायला पाहिजे. अजून मला किंवा रीनाला त्यांची जबाबदारी योग्य रीतीने पेलतील अशी माणसे सापडली नाहीत. आता तुमची व्यथा ऐकून मला एक विचार सुचला आहे. सांगू का?" शीला म्हणाली, "सांग ना!" रेणू  म्हणाली, "मला असे सुचवावेसे वाटते, या दोन मुलांना तुमच्या मीनाने जर शाळा सुरू होईपर्यंत दोन महिने तिच्याकडे ठेवून घेतले तर तिच्या रोजच्या जीवनात थोडा बदल अनुभवायला मिळेल. त्या मुलांना पण बरे वाटेल. एक सामाजिक कार्य म्हणून तिने आम्हाला मदत करावी आणि त्या दोन महिन्यांत आम्हाला त्यांच्यासाठी

चांगले फॉस्टर पेरेंट्स शोधता येतील." शीला म्हणाली, "मी कित्येकदा सांगितले की तुला मुलाची आवड आहे तर तू एखादे मूल दत्तक घे. तर ते तिला पटत नाही. मुलाचे आई-वडील कोण असतील? त्यांचे जीन्स त्यांच्यात असणार. त्यामुळे ते मूल कसे निपजेल असे तिचे म्हणणे असते". रेणू म्हणाली, "दोन्ही मुले सुसंस्कारित आहेत. आई-वडिलांनी त्यांना चांगल्या सवयी लावल्या आहेत आणि ती तिच्याकडे कायम नाही, फक्त सुट्टी पुरती राहतील. हे काम झाले, तर मला त्यांच्या पुढच्या भवितव्याच्या दृष्टीने विचार करायला थोडा वेळ मिळेल. शीला म्हणाली, "मी मीनाला विचारते. तिने हो म्हंटले तर तू त्या मुलांना घेऊन तिच्याकडे ये. ती इथूनच जवळ 'सॅने' सिटीत राहते. रेणूने बरे म्हंटले व शीला गेली.

रेणूने ही गोष्ट रीनाला सांगितली. रीना म्हणाली, "ती फॅमिली तुझ्यासारखी इंडियन असली तर मुलांच्या दृष्टीने चांगलेच होईल. ती तुझ्यासारखी मराठी बोलतात का? ते तर अधिकच चांगले कारण समिधा अजून खूप लहान आहे. आणि स्वाती त्यांच्याशी मराठीत बोलायची." त्यानंतर दोन दिवसांनी शीलाचा फोन आला व शनिवारी संचय व समिधासह रेणू शीलाबरोबर मीनाच्या घरी गेली.

संचय व समिधा गोरीगोमटी व फार गोड मुले होती. पण आधी बाबा हरवले व आता आई पण देवाघरी गेली आणि लक्ष्मी ऑंटी कडे रहावे लागले म्हणून बापुडी झाली होती. आता आणखी कोणाकडे जाऊन राहायचे असे एक मळभ त्यांच्या चिमुकल्या मनात दाटले होते. मीनाला त्यांच्याबद्दल सर्व माहिती दिली होती. त्यामुळे तिच्या मनात त्यांच्याबद्दल एक प्रकारची करुणा दाटली होती. त्यांना बघताच तिचे मन हळवे झाले. एवढ्या छोट्या मुलांचे आई बाबा मरण पावले, ते कुठे गेले, हे समजण्याचे त्यांचे वयही नाही. तिच्या मनातल्या मनात या लेकरांबद्दल माया भरून आली. तिने त्या दोघांना आपल्या जवळ घेऊन "बाळा तुझं नाव काय?", असे विचारले. संचय लगेच म्हणाला, "मी संचय व ही समिधा". "तुम्ही शाळेत जाता का? यावर संचयने सांगितले, "हो, मी सेकंडमध्ये व ही के.जी.त आहे". पण आता आम्हाला व्हेकेशन आहे. त्यावर मीना म्हणाली, "मग सुट्टीत माझ्याकडे राहाल का? माझे घर मोठे आहे. मागे खूप मोठी बाग आहे. आपण खूप खूप खेळू, मज्जा करू". तिच्या बोलण्यातील लाघवाने तिने त्या दोघांची मने जिंकली. ती दोघेही तिला बिलगून म्हणाली, "चालेल!" रेणू व शीला या दोघींना हे बघून बरे वाटले. मीना रेणूला म्हणाली, " आता यांना येथेच राहू दे. यांच्या जरुरीच्या वस्तू उद्या आणून दिल्या तरी चालेल". पण रेणू बरोबर रीना पण होती. तिने तिच्या कारमध्ये त्यांचे जुजबी सामान, कपडे व खेळ ठेवलेली बॅग घेतली होती. ती तिने आणून दिली.

संध्याकाळी मीनाचा नवरा मंगेश घरी आला. त्याला मीनाने आज मुले येणार ही कल्पना दिली होती. मुले आल्यावर तसे फोन करून सांगितले होते. त्यामुळे येताना त्याने मुलांसाठी निरनिराळे खेळ, बॉल, तसेच केक, डोनट असे सर्व आणले होते. त्याला ती मुले घरात आली की मीनाला आनंद होईल

या एकाच विचाराने त्याने या गोष्टीची संमती दिली होती. पण त्या मुलांना पाहून त्याला खूप बरे वाटले. ती दोघे पुढे होऊन म्हणाली, 'अंकल नमस्ते'. ते ऐकून त्याला छान वाटले. मीनाचा चेहरा पण त्याला खूप दिवसांनी आनंदाने फुललेला पाहायला मिळाला. तो मनात खुश झाला. तिन्हीसांजेला मीनाने देवासमोर दिवा लावला, त्याबरोबर दोघे देवासमोर हात जोडून उभी राहिली व त्यांनी शुभंकरोती म्हटले. ते ऐकून त्याला समाधान वाटले. ही मुले सुसंस्कारी दिसत आहेत असे त्याच्या मनात आले.

हळू हळू दोन्ही मुले मीना, मंगेश बरोबर छान रमली आणि ही दोघे त्या मुलांच्यात अडकली. संचय, समिधाला त्यांच्या आईने काही संस्कृत सुभाषिते, श्लोक शिकवले होते. मीनाने त्यात आणखी भर घातली. मीना त्यांना गोष्टीची पुस्तके वाचून दाखवायची. रामायण-महाभारताच्या चित्रकथा तिने त्यांच्यासाठी आणल्या. त्या त्यांना खूप आवडल्या. मंगेश त्यांच्याबरोबर बागेत फुटबॉल, बॅडमिंटन, लपंडाव खेळायचा. सगळे त्यात रमायचे.

त्या दोन चिमण्या जिवांच्या बागडण्याने ते घर हसू लागले. दोघेही अंकल आणि ऑंटी समिधा, संचयला प्रिय झाले. एक दिवस मीना समिधाला गोष्ट सांगून झोपवत होती, तर मीनाच्या कुशीत शिरून समिधाने तिला विचारलं, "मी तुला मम्मी म्हणू?" मीनाला ते ऐकून खूप आनंद झाला. ती म्हणाली, “तुला आवडेल ना, मला मम्मी म्हणायला तर म्हण”. “आणि मी अंकलना पप्पा म्हणेन”, समिधाने पुढे सांगितले. ते ऐकून तेथे आलेल्या मंगेशला हसू आले. तो म्हणाला, “मला चालेल, पण तुझ्या दादाला, संचयला चालेल का?" संचय शेजारीच ठोकळे लावून खेळत होता. तो पटकन उठून मंगेशच्या जवळ येऊन त्याला बिलगला. म्हणाला, “हो मी पण तुम्हाला मम्मी-पप्पा असेच म्हणणार”. मीना व मंगेशला खूप आनंद झाला. पण हा आनंद किती दिवस उपभोगायला मिळणार कारण आणखी पंधरा दिवसांनी या मुलांना फॉस्टर पेरेंट्स कडे पाठवावे लागणार. रीनाला कोणीतरी सापडले होते. माणसे चांगली होती. घर चांगले होते. केवळ समाजसेवा म्हणून त्यांनी त्यांची जबाबदारी स्वीकारली होती. पण फक्त एक वर्षासाठी! पुढच्या वर्षी दुसरे कोणीतरी. पण यामुळे या अनाथ मुलात अस्थिरतेची भावना निर्माण होते. ती कुठेच मोकळी होत नाहीत. नेहमी उद्याचा प्रश्न त्यांच्या मनात भीती निर्माण करतो. त्यामुळे त्यांच्या गरजेच्या वस्तू अगदी टॉयलेट टिश्यू सारख्या वस्तू ते जमा करून बॅगेत ठेवतात. मिळाल्या नाहीत, तर चोरतात. कोणाचे ऐकत नाहीत. आपल्या मनात येईल तसे वागतात. आपले आई-बाबा आपल्याला सोडून गेले, आता या जगात आपले कोणी नाही. आपले अस्तित्व आपणच सांभाळायचे आहे, असे लहान वयात प्रौढ विचार त्यांचा कब्जा घेतात. बुद्धी अपरिपक्व असते. त्यामुळे अनेक प्रश्न तयार होतात. रीनाला हे सर्व माहीत होते. त्यामुळे या अबोध मुलांसाठी, संचय-समिधासाठीही चांगले कायम घर मिळावे अशी तिची इच्छा होती. तसा तिचा प्रयत्न चालू होता पण शेवटी सर्व दैवाहाती हेच खरे!

इथे मीना व मंगेश या मुलांच्या सहवासात रमले, सुखावले. मीनाचा भाऊ अनिल हासुद्धा या एक दीड महिन्यात तिच्याकडे दोन चारदा आला. त्यालाही मीना मंगेश यांच्याबद्दल स्वागतार्ह वाटले. त्याने शीलाला तसे म्हटले तेव्हा ती म्हणाली, "हे सर्व रेणुकामुळे झाले. अनिलला 'कोण  ही रेणुका', तिला बघायची, भेटायची उत्सुकता लागली. त्याच्या बहिणीचे घर घटस्फोटाने तुटणार होते ते हसू खेळू लागले. ही गोष्ट त्याला फार सुखावणारी होती. त्या दिवशी मीनाने शीला व अनिलला आपल्याकडे जेवायला बोलावले. शीला, तिचे पती सुरेश व अनिल तिघेही एकदमच आले. सर्वजण ड्रॉइंग रूममध्ये गप्पा मारत बसलेले होते. दाराची बेल वाजवली. मीनाने दार उघडले तर दारात रेणुका व रीना. तिने त्यांना आत बोलावले. त्याचे असे झाले की रीनाला मीनाकडे यायचे होते. तिला मीनाला सांगायचे होते की संचय समिधासाठी फॉस्टर पेरेंट्स मिळाले आहेत. त्यामुळे सप्टेंबरमध्ये शाळा सुरू होण्याआधी दोन दिवस ती त्यांना घेऊन जाईल. शनिवार होता. रेणूला सुट्टी होती. संचय समिधाला भेटून खूप दिवस झाले होते. रीना जात आहे, तर तिच्या बरोबर आपण पण जाऊ या असा विचार करून ती रीनाबरोबर मीनाकडे आली. दोघींचे येणे असे अचानक झाले आणि रीनाचा निरोप ऐकून मीनाचा मूडच गेला. रेणूच्या ते लक्षात आले आणि हेही जाणवले की तिला जरा सांत्वनाची गरज आहे. पण रीनाला काम होते व ती लगेच निघाली. रेणू तिच्याबरोबर तिच्याच कारने आल्याने तिलाही निघावे लागले. एवढ्यात शीला म्हणाली, "रेणू तुला आज रजा आहे ना, मग तू थांब ना. मी तुला सोडेन." रीनाही म्हणाली, "हरकत नाही, कारण मला आज खूप कामे आहेत, खूप ठिकाणी जायचे आहे. तू इथे थांबून संचय, समिधाशी खेळून, गोष्टी करून आरामात घरी जाऊ शकशील." रेणू थांबली. ती मीनाकडे किचनमध्ये गेली. मीनाचा चेहरा उतरला होता. रेणू म्हणाली, "संचय, समिधा जाणार म्हणून तुला वाईट वाटते, हे मला कळतेय. ती मुलेही तुमच्या घरात रुळली आहेत, आनंदात आहेत. पण त्यांची शाळा तिकडे आहे. तू त्यांना इकडे पण घेऊ शकतेस. शाळा बदलता येईल. पण तुला त्यांची शाळा, अभ्यास घेणे हे सर्व जमेल का ?  तू जर त्यांचा पत्कर वर्षासाठी घेत असशील तर त्या लोकांना रीना पुढच्या वर्षासाठी बुक करेल. हा विचार तू नीटपणे, पूर्णपणे कर व मला सांग. असा चेहरा पाडून बसू नकोस. तुझ्या पाहुण्यांना ते खटकेल". तशी मीना हसली व म्हणाली, अग पाहूणे कोण? ते  भावोजी म्हणजे शीलाताईंचे पती. दुसरा माझा अनिल दादा. चल मी त्यांच्याशी तुझी ओळख करून देते.  आणि माझ्या चेहऱ्यावरचे बारीक सारीक भावही अनिलदादा लगेच टिपतो. बघूया तो काय सल्ला देतो तुझ्या सूचनेवर ते! मुले त्यांच्या खोलीत टी.व्ही. व खेळण्यात रंगली होती.

त्या दोघी बाहेर आल्या. तेव्हा मीनाने रेणूची अनिल व भावोजीशी ओळख करून दिली. त्यापूर्वी शीलाने रेणुकाबद्दल थोडी माहिती अनिलला दिली होती. मंगेश पण तिथेच होता. अनिलने मीनाकडे पाहत म्हटले, "काय आत्तापासून संचय-समिधाचा विरह तुझ्या चेहऱ्यावर दिसू लागला! तुला जर असे वाटते की त्यांनी इथून जाऊ नये, तर त्यांना इथे ठेवू शकतेस". त्यावर मीना म्हणाली, "दादा अरे

कालपासूनच त्यांनी आम्हाला मम्मी-पप्पा म्हणायला सुरुवात केली. त्यामुळे त्यांना आणि आम्हालाही खूप बरे वाटले". मंगेश म्हणाला, "अरे मला तर खरेच पप्पा झाल्यासारखे वाटले". शीला म्हणाली, "तुम्ही दोघे त्या लहानग्यांत गुंतले आहात. ती मुले चांगल्या घरातील सुसंस्कृत मुले आहेत. त्यांनाही तुमची माया लागली आहे. मागे मी तुम्हाला मूल दत्तक द्या म्हटले होते. तेव्हा त्याचे मूळ, कुळ याबद्दलच्या साशंकाचा विचार करण्यास हरकत नाही. त्यामुळे त्यांचे अनेकदा दारोदारी फिरायचे व अनिश्चित जीवन जगायचे भोग थांबतील. तुमचे आयुष्यही आनंदाने बहरेल. माझा विचार मी सांगितला. आता तुमचा निर्णय तुम्ही घ्यायचा". त्यावर अनिल दादा म्हणाला, "ताई तुझ्या विचाराला माझे मनापासून अनुमोदन!" रेणूला त्या भावंडांच्या संवादाची गंमत वाटली. तिने मंगेशकडे बघितले तर तो आसासून मीनाकडे बघत होता. जणू या प्रस्तावाला तिने होकार दिला तर त्याच्या मनासारखे होणार होते.

मीना म्हणाली, "चल उशीर झाला आहे, आधी जेवण आटपू". सर्व जण जेवायला बसले. संचय आणि समिधा आपल्या हाताने छान जेवत होते. मीना व मंगेश त्यांना काय हवे नको ते आवर्जून पहात होते. त्यांच्या डोळ्यात आई-बाबांचे प्रेम ओथंबून आलेले दिसत होते. सर्वांची जेवणे झाली व मुले परत त्यांच्या खोलीत व मोठी माणसे दिवाणखान्यात अशी वाटणी झाली. विविध विषयावर अनेक गप्पा झाल्या. शेवटी मीना म्हणाली, "शीलाताई, अनिल दादा मला या मुलांची जबाबदारी पेलेल का ? माझ्यामुळे त्यांच्या वाढण्यात, शिक्षणात कमतरता तर नाही ना येणार?" त्यावर दोघेही एकदम म्हणाले, "अजिबात नाही. तू भारतात वाढलेली सुशिक्षित स्त्री आहेस. चांगल्या कुळात जन्मलेली. कुटुंबात वाढलेली आणि इथे येऊनही पाश्चात्त्य संस्कृताळलेली नाहीस. त्यामुळे तू निश्चिंतपणे, सहजतेने त्यांची उत्तम आई होशील आणि मंगेश तर तुला सर्व कामात साथ द्यायला तयार असतो. त्याच्याही मनात या मुलांबाबत प्रेमभाव आहे. त्यामुळे तुम्ही त्यांना दत्तक घ्यायचा विचार केला तर सर्वांच्या दृष्टीने ते फार मोठे सत्कृत्य होईल". रेणूला अनिलचे बोलणे मुद्द्याला धरून मोजके व ठाशीव वाटले. वागण्या-बोलण्यातून माणसाचे व्यक्तित्व समजते. तिला माणूस स्वच्छ विचारांचा व जिद्दी वाटला.

(क्रमशः)

**© सौ. नलिनी करंडे**